# प्रकरण तिसरे

## बाबुराव ठाकूर : सामाजिक कार्य

भारताच्या राष्ट्रीय व आर्थिक विकासातील सर्वात मोठी आडकाठी म्हणजे हिन्दु समाजातील मागासलेपणा हा आहे. जगाच्या पाठीवरील कोणात्याही संस्कृतीत न सापडणारी अमानविय जातीप्रथा हिन्दु समाजात आढळते. जाती व्यवस्थेमुळे मानवा मानवामध्ये सामाजिक विषमतेच्या भिंती, उच्च - निचतेच्या जनाधारीत संकल्पना निर्माण झाल्या. परिणामत: मानवतेला काळीमा लावणारी अस्पृश्यतेची व्यवस्था निर्माण झाली. भारतीय इतिहासात एकीकडे जन्मनिष्ठ विषमतेची सामाजिक व्यवस्था हेतू पुरस्कर राबविली जात असे, तर दुसरीकडे ही मानव निर्मित, कृत्रिम व्यवस्था उलटून टाकण्याचे मर्यादित का होईना, पण जाणीवपूर्वक प्रयत्न देशाच्या विभिन्न भागात वेळोवेळी केले जात असे. मध्ययुगीन काळात संत ज्ञानोबा, संत तुकाराम, संत कबीर, गुरू नानक ( जन्म १५२६ ) इत्यादि संतानी हे महान कार्य केले, तर आधुनिक भारताच्या इतिहासात राजा राममोहन रॉय (१७७२-१८३३ ), स्वामी दयानंद सरस्वत ( १८२४-८३ ), स्वामी विवेकानंद ( १८६३-१९०२ ) महात्मा जोतिबा फुले ( १८२७-१८८९ ), प्रि.गोपाळ गणेश आगरकर ( १८५६-१८९५ ), न्या.रानडे( १८४२-१९०१ ), छत्रपती शाहू महाराज, कोल्हापूर ( १७७४-१९२२ ), डॉ.बाबासाहेब आंबेडकर ( १८९३-१९५७ ), महात्मा गांधी ( १८६९-१९४८ ), इत्यादि थोर नेत्यानी सामाजिक न्याय व समतेचा मानवतावादी कार्यक्रम मोठया प्रमाणात अंगीकारला. या महान नेत्यापासून स्फूर्ती घेऊन अनेकांनी या थोर कार्यास स्वत:स वाहून घेतले. बाबुराव ठाकूर याला अपवाद नव्हते. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून शिक्षाण प्रसाराचे कार्य त्यांनी हाती घेतले. याची माहिती आपण मागील प्रकरणात घेतली आहे. तसेच त्यानी सामाजिक सुधारणेचे ठोस

..

नियोजित कार्यक्रम बेळगाव परिसरात राबविले आहेत. त्यांच्या या सामाजिक कार्याचे दोन ठळक भाग पाडता येतील.

अ) नागरी कार्य: यात रस्ते व गटारे तयार करणे, विहिरी खोदणे, ग्राम आरोग्य, शेतकऱ्या विषयीचे प्रयत्न, दुष्काळ ग्रस्ताना मदत इत्यादिंचा समावेश होतो.

ब) सामाजिक कार्य: यात अंध:श्रध्दा, अस्पृश्यता निर्मूलन, मंदिर प्रवेश चळवळ, जातीय सलोखा, सामाजिक सलोखा, मद्यपान निषेध इत्यादिंचा समावेश होतो.

अ) बाबुरावांचे नागरी कार्य:

नागरी सुखसोयीबाबत वेळोवेळी बाबुराव " तरूण भारत " वृतपत्रातून विचार मांडत असले तरी सर्व साधारणपणे सन १९४० पासून त्यांनी या संदर्भात उपक्रम हाती घेतले. या उपक्रमाचे पहिले पाऊल म्हणजे तारीख २-६-१९४० रोजी त्यांनी चंदगड येथे आयोजित केलेली सभा होय [१]. या सभेस चंदगड महालातील* ७० खेडयातील नागरिक जमले होते. या सभेत बाबुरावानी चंदगड महालात मोठया प्रमाणावर रचनात्मक व सामाजिक कार्य हाती घेण्याचा संकल्प सोडला. हे कार्य शिक्षण समितीच्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली गावकऱ्यांच्या सहकार्याने पार पाडावयाचे होते. तेंव्हा हा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्याकरिता त्यानी सर्व प्रथम चंदगड येथे शिक्षकाकरिता एक दिवसाचे प्रशिक्षण शिबिर आयोजित केले [२]. ज्यात अनेक तज्ञांनी रस्ते व गटारे काढणे, ते स्वच्छ

(* महाल:- तालुक्याचा पोट भाग.) ..

ठेवणे, मेळखत ( कंपोस्ट खत ) तयार करणे, गावाचे आरोग्य इ.बाबत प्रशिक्षण दिले.

शिक्षकांना प्रशिक्षित केल्यानंतर १० जानेवारी ते १७ जानेवारी, १९४१ हा सप्ताह " ग्राम सुधारणा सप्ताह " म्हणून मोठया प्रमाणात साजरा करण्यात आला [३]. याकरिता चंदगड महालाची ( कोल्हापूर जिल्हा ) निवड करण्यात आली. कारण तो सर्वदृष्टीने मागासलेला भाग होता. अत्यंत नियोजन बध्द, पध्दतशीर व शास्त्र शुध्दपणे हे कार्य हाती घेण्यात आले.

बाबुरावांनी केलेल्या नागरी कार्यांत ठोबळमानाने खालील बाबींचा समावेश करता येईल:

१) शेडेगावात रस्ते तयार करणे व रस्त्याव्दारा खेडे मुख्य रस्त्यांना किंवा शहरांना जोडणे.
२) रस्त्याच्या दुतर्फा गटारे काढणे.
३) खेडेगावचे आरोग्यकडे लक्ष देणे.
४) शेतक-यांना मेळखत तयार करण्याचे प्रशिक्षण देणे.
५) दुष्काळग्रस्तांना मदत करणे.

१) <u>खेडेगावात रस्ते व गटारे काढणे, रस्त्याव्दारे खेडे मुख्य रस्त्यास जोडणे:</u>

<u>चांगल्या रस्त्याची निवड-गरज:</u>

महालातील प्रत्येक गावातील रस्ते अत्यंत गलिच्छ, आरोग्यास हानिकारक, खाचखळगयांनी युक्त व अरुंद होते. कांही ठिकाणी बैलगाडी जाऊ शकत नसे. रस्त्यावरील दगड पावसामुळे वर आल्याने बैलगाडी

..

नेणे त्रासाचे होते. दिवसा विशेषत: रात्री विजेची सोय नसल्यामुळे चालणे कठीण होते. त्यामुळे त्यानी गावातील रस्ते व गटारे तयार करण्याचे काम हाती घेतले. रस्ते तयार करताना पुढील गोष्टी लक्षात घेण्याचे आवाहन करण्यात आले [४].

१) रस्त्याची रुंदी कमीतकमी १२ किंवा १५ फूट ठेवावी.

२) रस्त्यावर प्रथम दगड व दगडावर घट्ट मुरुम घालून दगडी रूळाने दाबावा. रस्ता मध्यभागी उंच असावा.

३) रस्ता खराब होऊ नये व पावसाचे पाणी गावाबाहेर काढून देण्यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूस एक हात रुंद व एक वित खोल गटारे काढावीत.

वरील कामे करीत असताना बाबुराव ठाकूर यानी त्या त्या गावातील प्रत्येक घरातील एक-एक व्यक्ति घेऊन रस्ते तयार केले. काम सुरू असताना बाबुराव अनेक वेळा तज्ञ लोकाना काम दाखवित असत. अशा प्रकारे श्रमशक्तिच्या बळावर बाबुराव ठाकूर यांनी चंदगड महालातील ७० ते ८० गावातील रस्ते व गटारे पूर्ण केली [५]. हे रस्ते गावकऱ्यानी कोणताही मोबदला न घेता केले, त्यामुळे त्याना रस्त्याविषयी आपुलकी वाटू लागली.

याशिवाय जे रस्ते तयार करण्यासाठी जिल्हा लोकल बोर्डने अनुदान मंजूर केले असेल ती कामे गावकऱ्यानी श्रमदानातून पूर्ण करून, मंजूर रकमेतून दुसरी ग्राम सुधारणा योजना राबवून इतर गावासमोर आदर्श निर्माण केला. तसेच चंदगड महालात जंगल, दऱ्याखोरे जास्त होते. तसेच तेथील गावाना जाणारे रस्ते नव्हते, त्यामुळे त्यांचा शहराशी संपर्क येत नव्हता. जे छोटे छोटे रस्ते होते, तेही चांगले नव्हते. त्यामुळे

..

खेड्यातील लोकांना शहराकडे किंवा तालुक्याच्या गावी सरकारी कामासाठी जाणे अत्यंत त्रासाचे होते. दळण वळणाच्या सुविधा नसल्यामुळे तेथे वृत्तपत्रे येत नसत, लोकलबोर्डाच्या शाळा सुरू झाल्या नसल्यामुळे शिक्षण, प्रसार होत नसे, त्यामुळे देशातील आणि परदेशातील विविध घडामोडीपासून तेथील लोक अलिप्त होते. हे ओळखुन खेड्यातील लोकना देशातील घडामोडीत सहभागी करून काँग्रेस बलवान करण्यासाठी बाबुराव ठाकूर यानी सन १९४०-१९४१ या दोन वर्षात चंदगड महालातील ८० खेडे गावातून रस्ते काढून ते मुख्य रस्त्याना जोडून टाकले [६]. हे काम बाबुराव ठाकूर यानी खेड्यातील लोकांच्या श्रमदानावर, त्याना एकही पैसा न देता यशस्वी करून दाखविले व खेडी संघटीत व स्वावलंबी बनविण्याच्या प्रक्रियेस चालना दिली. हे काम मोठया प्रमाणावर हाती घेतल्यामुळे कामाच्या सोयीसाठी महालातील एकूण खेड्याचे १० गट पाडून प्रत्येक गटासाठी एक स्वतंत्र कमिटी नेमण्यात आली. या कमिटीने काम पूर्ण होताच संपूर्ण अहवाल तरूण भारत ऑफिसकडे पाठवावयाचा होता. या १० कमिटीवर देखरेख ठेवण्याचे काम चंदगड महालाचे प्रांत अधिकारी श्री.मुंडकर यांच्याकडे सोपविण्यात आले होते [७].

महालातील कोणत्या खेड्यात काम केले, त्यात किती लोकांनी भाग घेतला. रस्ते लांब-रुंद किती होते ही माहिती खालील तक्त्यात दिली आहे [८].

## गावातील व गावाबाहेर तयार केलेल्या रस्त्याचा तक्ता

| अ.नं. | गटाचे व गावाचे नांव | गावातील रस्ते लांबी | गावातील रस्ते रूंदी | गावापासून मोठया रस्त्याना जोडलेले रस्ते लांबी | गावापासून मोठया रस्त्याना जोडलेले रस्ते रूंदी | रस्त्यावर किती लोक राबले त्याची संख्या | सेन्ससनुसार गावचे कोड नं. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १) | अक्कूर गट: | | | | | | १६ |
| १) | विंझाने | २२१० | ९ | ३९० | १३ | २४० | १२ |
| २) | मुगळी | २६०० | ९ | - | - | २०० | २१ |
| ३) | सोनारवाडी | १२०० | ८ | - | - | १५० | २२ |
| ४) | शिरोली | ८२५ | ८ | - | - | ६० | १० |
| ५) | पोरेवाडी | २३०० | ९ | - | - | २७५ | २० |
| ६) | सातवणे | १४५५ | १० | १२१० | १४ | ४०० | ४८ |
| ७) | आसगोळी | ८८५ | ११ | - | - | १७५ | ४६ |
| ८) | उत्साळी | १३४४ | १० | - | - | १०५ | ४९ |
| ९) | आमरोळी | १८१० | ९ | - | - | २०० | १९ |
| १०) | आल्बादेवी | १३५० | ९ | - | - | ८० | ११ |
| ११) | बोंजूर्डी | ९४० | ८ | - | - | १०० | १४ |
| १२) | मोरेवाडी | ३७५ | ९ | - | - | १५० | १३ |
| २) | तांकुवाडी गट: | | | | | | ७५ |
| १) | कुक्करवाडी | ३७८८ | १२ | - | - | २२५ | ७३ |
| २) | दाटे | ३२३८ | ९ | - | - | २०० | ६९ |
| ३) | नरेवाडी | ७७६ | १० | २९४ | - | २१० | ९२ |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४) | गुडेवाडी | २०२२ | ११ | - | - | १३५ | ७१ |
| ५) | नरवाडी | १०२० | १० | - | - | १२० | |
| ६) | मलगड | ५०० | १० | - | - | १२० | ७२ |
| ७) | लाकुडवाडी | ६५० | १० | - | - | १५० | ४३ |
| ८) | शिवापागे | ७७५ | ११ | - | - | २०० | ४१ |
| ९) | लकीकट्टे | ८६४ | ११ | - | - | २०० | २३ |
| ३) | हलकर्णी गट: | | | | | | ११६ |
| १) | माडकके | १८२५ | १२ | १०२० | १० | ६६२ | १३४ |
| २) | जंगमहट्टी | ११९२ | १२ | १३०० | २२ | ५६० | १३३ |
| ३) | आंबेवाडी | ८८५ | ९ | - | - | १०० | १२६ |
| ४) | कालिवडे | ९०२ | ११ | - | - | १०० | १३२ |
| ५) | तुर्केवाडी | ५०० | १९ | ५०० | - | ४०० | २६ |
| ४) | कानूर गट: | | | | | | ४ |
| १) | कानूर खुर्द | ३८५५ | १२ | - | - | ४०० | २ |
| २) | कुजवडे | २३७८ | ९ | - | - | १८८ | ७ |
| ३) | कुर्णी | १२०१ | ९ | ३७० | १५ | २८३ | (१००) ५ |
| ४) | गोगोली | १२६० | १९ | - | - | १४८ | ५७ |
| ५) | धामापूर | १६१४ | ९ | ७३६ | २३ | ३६० | ६ |
| ६) | फिळणी | १२२१ | १२ | - | - | १५० | ५८ |
| ७) | बिजूर | ११०० | १० | ५३५ | १४ | २०० | ५६ |

..

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५) | <u>हिंडगाव गट:</u> | | | | | | ५३ |
| १) | हिंडगाव | ३७५० | १३ | १९०० | १४ | ४०० | ५३ |
| २) | गवसे | १२५६ | ९ | २४५ | १३ | १८० (३०) | ८ |
| ३) | इब्राहिमपूर | १२९६ | ९ | - | - | २०० | ९ |
| ४) | कानडी | १९५० | १२ | - | - | २५० | ५१ |
| ५) | इनामसावर्डे | ७२० | ९ | - | - | ७० | ५२ |
| ६) | काजणे | ४१२ | १२ | - | - | ८० | ८३ |
| ७) | म्हाळुंगे | ३७५ | १० | २०५ | १२ | ९० २० | १४४ |
| ८) | पोवाचीवाडी | ५०० | १० | - | - | १२० | ५० |
| ६) | <u>नागनवाडी गट :</u> | | | | | | ६६ |
| १) | नागनवाडी | १२०२ | ९ | ४०० | १२ | २०५ ४५ | ६६ |
| २) | कोरज | ८५४ | १२ | - | - | १३५ | ६८ |
| ३) | कुर्तनवाडी | ४८० | ११ | - | - | ४० | ६४ |
| ४) | कोनेवाडी | ६०० | ९ | - | - | ४० | ९५ |
| ५) | शिरगांव मौजे | १४५५ | १० | ४५० | १३ | ४५० ३० | ६५ |
| ७) | <u>चंदगड गट :</u> | | | | | | ६४ |
| १) | कोकरे | २१६० | १० | - | - | २०० | ६२ |
| २) | उमगांव | १६५० | ९ | - | - | १५० | ६० |
| ३) | नागवे | ९६२ | १२ | १०२९ | ११ | २५० | १०० |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४) | इनाम कोळींद्रे | १३२० | ९ | - | - | १२५ | ९९ |
| ५) | आसगांव | ७९० | ९ | - | - | १८० | ९६ |
| ६) | जांब्रे | ५९८ | ९ | - | - | ८० | ५९ |
| ७) | न्हावेली | १२५५ | ९ | - | - | १०० | ६१ |
| ८) | हंबरे | ४१४ | ८ | - | - | ४५ | ९७ |
| ९) | अड्डुरे | २२५ | ९ | - | - | ४० | ६३ |
| ८) | हेर्रे घट : | | | | | | १०८ |
| १) | खामदळे | ५९४ | ९ | ५०० | १३ | १२५ | १०१ |
| २) | खालमागुडवळे | १८२७ | १० | - | - | १८० | १०७ |
| ३) | सालसा सावर्डे | ५०० | १२ | - | - | ७५ | १०९ |
| ४) | कोळींद्रे | १३७५ | १२ | ४७५ | १३ | १९० | ११० |
| ५) | शिपूर | ३०४ | १२ | - | - | ४० | १११ |
| ९) | पाटणे घट : | | | | | | १२७ |
| १) | पाटणे | ७९५ | १० | - | - | १०० | १२७ |
| २) | कोदाळी | १२०० | ९ | - | - | १२० | १४२ |
| ३) | नांदवडे | ९३० | ११ | - | - | १४० | ११२ |
| ४) | पार्ले | ६२५ | १२ | ५५० | १४ | २०० | १३० |
| ५) | मोटणवाडी | ५०० | १२ | - | - | ५० | १२९ |
| ६) | शेवाळे | - | - | - | - | - | ११३ |
| ७) | जेलुगडे | - | - | - | - | - | १३१ |
| ८) | काळसगादे(कोदाळी) | - | - | - | - | - | १४१ |
| ९) | रांदेवाडी | - | - | - | - | - | १२८ |

..

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १०) | पारगड गट: | | | | | | १०६ |
| १) | इसापूर | ८४० | ५ | ४०० | १३ | १८० | १०२ |
| २) | मिरवेल | ८०० | ४ | - | - | ७० | १०३ |
| ३) | मोर्ले | २२७५ | ४ | ६०० | १३ | २०० | १०४ |
| ४) | घोडगेवाडी | ३६०० | ४ | - | - | २०० | १०५ |

-0-0-0-0-0-0-0-0-0-0-0-0-0-0-0-0-0-0-0-0-0-0-0-0-0-0-0-0-0-0-0

अशाप्रकारे गावातील रस्ते व गावाबाहेरील रस्ते तयार करून खेडेगाव मुख्य रस्त्यांना जोडले. तसेच हे काम कोठे कोठे केले ते नकाशात दाखविले आहे.( नकाशा७ पान नं १८५ पहा).

खेडेगावच्या आरोग्यकडे लक्ष :

खेडयातील सर्वसामान्य जीवन अस्वच्छ व आरोग्यास अपायकारक होते. घाण, केरकचरा, अस्त-व्यस्त पसरलेला असे. पावसाळयात सर्वत्र दलदलीचे साम्राज्य असे. त्यामुळे रोगजंतूंचा फैलाव होऊन रोगराईस आमंत्रणच असे. बाबुरावानी याला आळा घालण्याचा प्रयत्न केला.

सर्वप्रथम बाबुरावांनी ग्रामस्थांच्या सहकार्याने मलमूत्र विसर्जनासाठी घाण, केरकचरा टाकण्यासाठी गावाबाहेर उकीरडे तयार करून घेतले. पावसाळयात पाणी उकळून गार करून प्यावे असे सांगितले.तसेच श्रमदानाने तयार केलेल्या व जुन्या विहिरीना कठडे बांधले व रहाट बसविले. त्यामुळे वरच्यावर पाणी उपसता येणे शक्य झाल्यामुळे लोकांचे विहिरीत जाणे बंद झाले. त्यामुळे विहिरीतील पाणी स्वच्छ राहू लागले आणि त्याहून महत्वाचे म्हणजे ' नारू ' रोगास प्रतिबंध बसला [१०].

..

या भौतिक सुधारणा राबविल्या तरी मुख्य गरज होती ग्रामस्थात स्वच्छतेविषयी, निरोगी जीवनाविषयी जागृती निर्माण करण्याची. बाबुरावांनी हेसुध्दा केले. कारण खेड्यातील आरोग्य; आहार, आरोग्य इ. वर आरोग्य आधिकाऱ्यांची व्याख्याने आयोजित करून त्याव्दारे गावकऱ्यांना आरोग्य विषयक प्राथमिक आवश्यक माहिती देण्याचा प्रयत्न केला.

खेडे गावात शौचकूपाची सोय नसल्यामुळे ग्रामस्थाना प्रात: विधीसाठी उघड्यावर कोठेही बसावे लागत असे. बाबुरावांना प्रत्येक खेड्यात शौचकुप उपलब्ध करून द्यावयाची इच्छा होती, पण आर्थिक अडचणीमुळे ते जमले नाही. पण मोठया गावात त्यांनी हा उपक्रम राबविला [११] याकामी चंदगडच्या प्रांत अधिकाऱ्यांची त्याना खूप मदत झाली. त्यामुळे चंदगडची पायखान्याची मुख्य गैरसोय दूर झाली.

**आधुनिक शेती :**

आधुनिक तंत्रज्ञानाचा शेतीत वापर केल्याशिवाय शेतकऱ्यांचे शेतीचे उत्पन्न वाढणार नाही, त्यांचे जीवनमान सुधारणार नाही, असे बाबुरावांना वाटत होते, म्हणून बाबुरावांनी प्रत्येक गावात मेळखत ( कंपोस्ट खत ) कसे तयार करावे याचे प्रात्यक्षिके तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली खेडोपाडी आयोजित केली होती.[१२] ( कंपोस्ट खत :- सर्व वनस्पती व पालापाचोळा गोळा करून खड्यात टाकावा, त्यावर शेणाचा किंवा मातीचा थर देवून पाणी सोडावे. त्यामुळे तो कुजतो असा खत शेतीसाठी उत्तम असतो.)

शेतकऱ्यानी अशा खताचा वापर केल्यास शेतीचे उत्पादन वाढेल हे बाबुरावांनी त्यांच्या मनावर बिंबविल्यामुळे शेतकरी त्या खताचा वापर करू लागला.

..

बाबुराव ठाकूर आणि दुष्काळग्रस्त:

भारतीयांचे शेती जीवन अद्यापही पर्जन्यवृष्टीवर अवलंबून आहे. पिढयान् पिढया भारतीय शेतकऱ्यास निसर्गाच्या लहरीवर अवलंबून रहावे लागत आहे. पाऊस अधिक झाला तर ' ओला दुष्काळ ', पाऊस कमी पडला अथवा पडला नाही तर ' कोरडा दुष्काळ ' हे नैसर्गिक आपत्तीचे क्रूर चक्र शेतकऱ्यांच्या नशीबातच लिहून ठेवले आहे. बेळगाव परिसरात सुध्दा असा दुष्काळ पडल्याचे ऐतिहासिक दाखले उपलब्ध आहेत. सन १९४६ मध्ये बेळगाव जिल्हयात पाऊस खूपच कमी पडल्यामुळे शेतीची उभी पिके जळून गेली होती आणि मोठा दुष्काळ पडला होता. दुष्काळा सारखी जेंव्हा नैसर्गिक आपत्ती येते, तेंव्हा सरकारने शेतकऱ्यासंबंधी उदार धोरण स्वीकारावे अशी जनतेची रास्त अपेक्षा असते, आणि कोणतेही कल्याणकारी सरकार असे धोरण स्वीकारते. पण दुर्दैवाने ब्रिटिश सरकारने दुष्काळग्रस्त शेतकरी वर्गास कोणतेही सहाय्य न करता त्यांच्याकडून शंभर टक्के महसूल गोळा करण्याचा तगादा लावला, आणि सरकारी यंत्रणा या कार्यास गुंतविली. अशा बिकट प्रसंगी बाबुरावांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नास वाचा फोडली. संपूर्ण बेळगाव परिसरात सरकारच्या दडपशाही विरुध्द दौरे काढून त्यानी शेतकरी वर्गात जागृती निर्माण केली. ३० जानेवारी, १९४६ रोजी त्यांचा एक प्रचंड मोर्चा आयोजित करून जिल्हाधिकारी कार्यालयावर नेला [१३], आणि संपूर्ण बेळगाव जिल्हा दुष्काळी म्हणून जाहीर करण्याचा आग्रह धरला. परिणामत: सरकारला या प्रचंड जनशक्तिसमोर नमावे लागले. आणि सरकारने त्वरीत त्यांची मागणी मान्य केली व बेळगाव जिल्हयास दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केले. या बिकट प्रसंगी बाबुरावाना ज्या अनेक व्यक्तिंचे बहुमुल्य सहकार्य व साथ लाभली होती त्यामध्ये शिवराम कोप्पळांचे नाव नमूद करणे आवश्यक आहे. १९४६ च्या प्रसंगाची पुनरावृत्ती सन १९५३ मध्ये झाली पण फरक एवढाच होता की, १९५३ चा दुष्काळ अतिवृष्टीमुळे झाला होता. बेळगाव परिसरातील पिके नष्ट

..

झाली होती. " तरूण भारतच्या " माध्यमातून बाबुरावानी बेळगाव परिसर दुष्काळ म्हणून जाहीर करण्याचे सरकारला वारंवार आवाहन केले होते [१४]. पण त्याहून महत्वाचे म्हणजे बाबनराव सावंतांच्या, ( संपादक, लोकमत ), सहकार्याने त्यांनी दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी एक 'स्वयंसेवी संघटना' स्थापन केली [१५]. आणि या संघटनेव्दारे अनेक प्रकारे दुष्काळग्रस्ताना मदत करण्याचा प्रयत्न केला. अशाच कार्यक्रमाचा एक भाग म्हणून डॉक्टरांचे दौरे बेळगाव परिसरात आयोजित केले, आणि दुष्काळ पिडीतांची नियमितपणे तपासणी करण्यात आली. दुष्काळ म्हणजे रोगराईस आमंत्रणाच असते हे ध्यानात घेतल्यावर त्यांच्या या आरोग्य शिबीराचे महत्व पटते.

ब) <u>सामाजिक कार्य:</u>

यात बाबुरावानी केलेल्या (१) अंधश्रध्दा निर्मूलन (२) अस्पृश्यता निर्मूलन (३) मंदिर प्रवेशाची चळवळ (४) मद्यसेवन विरोधी कार्य (५) जातीय सलोखा व सामाजिक शांततेसाठीचे प्रयत्न या कामाचा अंतर्भाव होतो.

१) <u>अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य:</u>

भारतीय जनमानसावर त्याकाळी बालहत्या, नरबळी, सतीप्रथा, विधवांचे मुंडण, प्राणीबळी इ.अनेक कालबाह्य क्रुर प्रथा व रूढींचा पगडा होता. त्यामुळे समाज प्रगती करू शकत नव्हता, म्हणून अनेक सुधारकांनी धर्माच्या नावाखाली रूढ असलेल्या रूढी नाहीशा करण्यासाठी प्रयत्न करूनही समाजात अनेक रूढी आजही आढळतात. यास बेळगावचा परिसरही अपवाद नाही.

..

बाबुरावानी बेळगाव ( कर्नाटक राज्य ) परिसरात अस्तित्वात असलेल्या प्रथाना विरोध करून समाजाला विज्ञान युगाकडे नेण्याचा प्रयत्न केल्याचे खालील घटनेवरून दिसू येते.

हेरे गांवी ( तालुका बेळगाव ) प्रतिवर्षी २७ मार्चला माटेकरांची जत्रा भरत असे [१६]. या निमित्याने शेकडो कोंबड्या व बक-यांचे उघड्यावर बळी दिले जात असे. या क्रुर,अमानवी प्रथेविरुध्द बाबुरावानी १९४२ मध्ये आपल्या ' तरुण भारत ' मधून आवाज उठविला. सरकारने पुढाकार घेऊन या प्रकाराला आळा घालण्याचे आवाहन केले होते. पण सरकारकडून कोणतीच कृती झाली नाही. तेंव्हा १९४२ मध्ये जत्रा भरण्याच्या दोन दिवस अगोदर ठाकूरांनी २५ मार्चला स्वत:च्या सहीने ही प्रथा बंद करावी म्हणून बेळगाव जिल्हाधिका-याकडे अर्ज केला [१७]. परिणामत: जिल्हाधिका-यानी ' मनाई ' आदेश काढला. दुर्दैवाने दप्तर दिरंगाईमुळे मनाई आदेश २६ मार्च पर्यंत हेरे गांवी पोहचला नाही. पण बाबुरावानी माघार घेतली नाही. बाबुराव २६ मार्च,१९४२ रोजी स्वत: हे-यात जातीने हजर राहून प्राण्याच्या बळीच्या पाशवी प्रथेस हिन्दु धर्मशास्त्राचा आधार नाही म्हणून ती करू नका असे त्यांनी ग्रामस्थाना व यात्रेकरूना कळकळीचे आवाहन केले [१८]. त्यावर्षी बाबुरावाना फारसा प्रतिसाद मिळाला नाही, पण पुढे ही प्रथा बंद झाली याचे श्रेय बाबुरावाकडे जाते.

२) अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य:

अस्पृश्यतेचा हिन्दु समाजाला शाप आहे, माणुसकीला काळीमा आहे, समाजाच्या प्रगतीतील सर्वात मोठा अडथळा आहे. अस्पृश्यता निर्मूलनाचे जाणीवपूर्वक प्रयत्न समाजातील सर्व थरातील सुधारकांनी केले व करीत आहेत. महात्मा गांधीनींसुध्दा अस्पृश्यता निर्मूलनावर खूप भर दिला.

..

त्यांच्या प्रभावामुळे भारतातील तरूण वर्गाने पण हे श्रेष्ठ सामाजिक कार्य अंगिकारले होते. त्यास बेळगाव अपवाद राहिले नाही.

अस्पृश्यता नाहीशी करण्यासाठी बाबुरावांनी अण्णु गुरूजी ( १९०५-१९९० ), जयदेव कुलकर्णी, यांच्या सहकार्याने " हरिजन सेवा संघ " मंडळाची स्थापना केली होती [१९]. या मंडळामार्फत प्रभातफेरी भजन, व्याख्याने याद्वारे खेडया-खेडयात अस्पृश्य समाजात जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तसेच बाबुरावांनी वैयक्तिक सभाही आयोजित केल्या होत्या. उदा. तारीख ४-५-१९३३ - रोजी चंदगड, ६-६-१९३३ रोजी शेडबाळ, ७-६-१९३३ रोजी उगार खुर्द, ८-६-१९३३ रोजी मुरगुडी आदि ठिकाणच्या सभातून बाबुरावांनी सामाजिक समता, न्याय व अस्पृश्यता निवारणाचा पुरस्कार केला व या तत्वाकरिता लढा देण्याचे आवाहन केले [२०]. तसेच भंगी काम करणारे अस्पृश्य नाहीत, हे सफाईचे पवित्र कार्य करतात, ते आपल्यातीलच आहेत हे लोकाना कृतीने पटवून देण्यासाठी बाबुराव ठाकूर, जयदेव कुलकर्णी, केशवराव गोखले, बळवंतराव दातार आदिंनी बेळगावातील संडासांची सफाई स्वत: करून [२१] जनतेला नवीन आदर्श घालून दिला.

तसेच बाबुरावांनी " तरूण भारत " मधूनसुध्दा या तत्वाचा प्रसार व पाठपुरावा वारंवार केला. या संदर्भात त्यांचे दिनांक १९-५-१९३३ व दिनांक ९-६-१९३३ च्या तरूण भारतमधील " अस्पृश्यतेचा कलंक " लेख महत्वपूर्ण ठरतात [२२].

### ३) मंदिर प्रवेशाची चळवळ:

बाबुरावांनी व्याख्यानातून, लिखाणातून सामाजिक जागृती करण्याबरोबरच त्यानी समाजात अस्तित्वात असलेल्या कालबाह्य रूढी, परंपरा विरूध्द सक्रीय चळवळ उभारली.

..

मंदिर प्रवेश ही हिंन्दुंची सामाजिक समस्या होय, हरिजनाना मंदिरात, सार्वजनिक पाणवठयावर प्रवेश नव्हता. तेंव्हा बाबुरावांनी जयदेव कुलकर्णी, केशवराव गोखले, ( दोघेही स्वातंत्र्य सेनानी ) इ.च्या सहकार्याने बेळगाव शहरात १९२२ व १९३३ मध्ये मंदिर प्रवेशाची चळवळ हाती घेतली [२३]. त्यानी बेळगावातील मारूतीच्या प्रसिध्द मंदिरात ५० हरिजनासमवेत प्रवेश केला. सामाजिक समतेच्या बेळगाव परिसरातील चळवळीच्या इतिहासातील हा महत्वाचा टप्पा मानला जातो. तसेच हरिजनाच्या मंदिर प्रवेशानंतर बाबुरावांनी सार्वजनिक पाणवठे हरिजनाना खुले करण्याविषयीची समस्या हाताळली [२४], आणि हॉटेलमध्ये पण त्याना प्रवेश मिळण्यासाठी बाबुरावांनी सक्रीय प्रयत्न केले आणि त्यांच्या या प्रयत्नाना यश मिळाले. (कृपया नकाशा १, पान १८४ पाहणे)

४) मद्यसेवन विरोधी कार्य:

मद्यसेवन व मद्यपान ही भारतीय जीवनास लागलेली किड आहे. महात्मा गांधी सारख्या अनेक थोर नेत्यानी या घातक सवयींचा निषेध वारंवार करून जनतेस त्यापासून दूर राहण्यास सांगितले. समाजातील एक मोठा गट मद्याच्या आहारी गेल्यामुळे मद्यपान ही भारतीयांची एक मोठी समस्या बनली आहे. अनेक कुटुंबे यापायी उध्वस्त झाली आहेत. सामाजिक व नागरी तणावाचे व हिंसाचाराचे प्रसंग वारंवार आले आहेत. बेळगाव शहरातही मद्यसेवन मोठया प्रमाणावर होत असे. ते मानवी शरीरास हानीकारक असूनही अनेक गुत्ते सरकारच्या पाठिंब्यावर चालू होते. तेंव्हा 'मद्यपान निषेधाची' व 'सरकारी दारू गुत्यासमोर निरोधने' (पिकेटींग ) करण्याची मोहिम बाबुरावानी आपल्या सहकार्यांच्या मदतीने सुरू करून जवळ जवळ सहा महिने शहरातील दारूगुत्ते बंद पाडले [२५]. याचा उल्लेख व माहिती पहिल्या प्रकरणात विस्तृतपणे केली आहे. मद्यसेवन करणाऱ्याची गाढवावरून धिंड काढण्यासही त्यानी कमी केले नाही. यासंदर्भात त्यांनी

..

तीन महिन्याची शिक्षासुध्दा उपभोगली [२६]. वैयक्तिक जीवनात बाबुराव निर्व्यसनी तर होतेच, या शिवाय तंबाखू, दारू, विडी, सिगार, मादक पेय इत्यादिपासून विद्यार्थी व समाज दूर रहावा यासाठी प्रयत्नशील असत [२७]. मद्यपान हा त्यांच्या दृष्टीकोनातून नैतिक व सामाजिक प्रश्न होता आणि आपल्यापरीने त्याचे परिमार्जन करण्याचा त्यांनी मर्यादित का होईना प्रयत्न केला होता.

५) जातीय सलोखा व सामाजिक शांतता:

अस्पृश्यता हा जसा हिन्दु समाजास शाप आहे, तसाच जाती जाती मधील तणाव व त्यातून निर्माण होणारा हिंसाचार हा सुध्दा शापच आहे. हिन्दु समाजातील भिन्न भिन्न जातीत सलोखा कसा राहील व तो कसा टिकवून ठेवता येईल हे समाजसुधारक व राजकीय नेत्यापुढील मोठे आवाहन आहे. बाबुरावांनी एकीकडे अस्पृश्यता व जातीभेद निर्मूलनासाठी प्रयत्न केले. पण दुसरीकडे जाती-जातीमधील सलोखा टिकून राहण्यास सुध्दा कटीबध्द राहिले. याचे ठळक उदाहरण म्हणजे महात्मा गांधी वध व त्यातून निर्माण झालेला जातीय तणाव. ३० जानेवारी,१९४८ रोजी दिल्ली येथील बिर्ला हाऊसच्या मैदानावर सायंप्रार्थनेस गांधीजी जात असताना नथुराम गोडसे या पुण्यातील ब्राम्हण - हिन्दुमहासभेच्या कार्यकर्त्याने हत्या केली. परिणामत: देशभर ब्राम्हण विरोधाची लाट पसरली. बेळगाव परिसर याला अपवाद नव्हता. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व हिन्दु महासभेच्या कार्यकर्त्यांच्या घरादारावर दगडफेक होऊ लागली, त्यांच्या घरादारांना आगी लावण्यात येऊ लागल्या व त्यांच्या हत्येचे चक्र सुरू झाले. हिंसाचाराने जोम धरला. या बिकट प्रसंगी बाबुरावांनी, जीवनराव यळगी, रघुआण्णा मेळगी व इतर सहकार्यासमवेत दंगलग्रस्त भागाना भेटी देऊन प्रक्षुब्ध बनलेल्या जमावास शांत करण्याचा प्रयत्न केला [२८]. बेळगाव शहरात

..

हा हिंसाचार मर्यादित राहिला याचे बुहंताशी श्रेय बाबुरावाना व त्यांच्या सहकार्याना जाते. परंतु त्याचे प्रयत्न फक्त बेळगाव शहरापुरतेच मर्यादित नव्हते. बेळगाव परिसरातील निपाणी, चिक्कोडी, चंदगड, आजरा याठिकाणी मोठया प्रमाणात दंगल पसरली होती. परिणामत: ब्राम्हण वर्गात मोठया प्रमाणात असुरक्षितता निर्माण झाली होती व प्रचंड प्रमाणात लोकांचे बेळगाव शहराकडे स्थलांतर सुरू झाले होते. हजारो ब्राम्हण निर्वासितानी बेळगावचा आश्रय घेतल्यामुळे बेळगाव शहरात नवीन प्रश्न निर्माण झाले होते. बाबुरावानी अशा दंगलग्रस्त निर्वासितांच्या मदतीकरिता " स्वयंसेवी संघटना " निर्माण केली [२९]. व बेळगावच्या तरुण वर्गास या संघटनेव्दारे काम करण्याचे आवाहन केले. या निर्वासिताकरिता त्यांनी मोठया प्रमाणात वर्गणी जमा करून निर्वासितासाठी रहाणे, खाण्या-पिण्याची व औषधाची व्यवस्था केली. दंगलग्रस्त भागात पोलिसांच्या सहकार्याने त्यांनी शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला, पण याहून महत्वाचे म्हणजे श्रीरंग कामत, रामकृष्ण प्रभू व इतर स्वयंसेवकांचे पथक घेऊन दंगलग्रस्त भागाचा दौरा केला. हिंसाचार न करण्याचे व शांत रहाण्याचे आवाहन त्यानी जनतेस केल्यामुळे शांता प्रस्थापित झाली. घरदार सोडून आलेल्या निर्वासितात सुरक्षिततेची भावना निर्माण करून त्यांना त्यांच्या गावी पुन्हा स्थाईक होण्यास बाबुरावांनी मानवतावादी दृष्टीकोनातून बहुमोल सहाय्य केले [30]. अशारितीने बेळगावला जे दंगलग्रस्त ब्राम्हण निर्वासित म्हणून आले होते ते बेळगावचे कायम न रहाता, ते आपआपल्या गावी स्थाईक झाले याचे श्रेय बाबुरावाना व त्यांच्या उमद्या सहकार्याना जाते.

अशारितीने बाबुराव ठाकूरांनी मोठया प्रमाणात सामाजिक कार्य अंगीकारले, ज्यात स्वयंस्फूर्तीने विहीरी खोदणे, रस्ते व गटारे तयार करणे,

..

ग्राम आरोग्य, शेती विकास इत्यादि नागरी कार्यापासून सामाजिक अस्पृश्यता निर्मूलन, मंदिर प्रवेश, अंधश्रध्दा निर्मूलन इत्यादि सामाजिक कार्यांचा समावेश होतो. बाबुराव ठाकूर हे कांही सामाजिक कार्यकर्ते नव्हते. त्यांचे सामाजिक कार्य त्यांच्या सुविद्य व सांस्कृतिक जीवनाचा एक भाग होता. तो मुख्यत: सन १९३८ ते १९४२ या कालखंडात प्रकर्षाने उठून दिसला.

-000-

## संदर्भ सूची


१) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.४-६-४०, पान ३ व
अर्धसाप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.२३-२-५४,पान ४.

२) शानबाग,आर.डी. मानाचा मुजरा, बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती सुवर्ण महोत्सवी स्मरणिका १९३७-८८, ता.८-१-८९, पान ७०.

३) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.२१-१-४१, पान ३.

४) उपरोक्त, पान ५९-६०.

५) किता: पान ९०.
सौ.प्रभु प्रिया, समरांगण हे जीवन ज्यांचे, तरूण भारत प्रेस, बेळगाव, मे,१९७५, पान ५०.

६) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.२६-५-४२, पान ९,
सौ.प्रभु प्रिया, उपरोक्त, पान ५०.
गुंजीकर,बी.आर. आणि आमची शिक्षण समिति,
कामत,हरिभाऊ, प्रकाशक, स्मृतिगंध, बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती, स्मरणिका, ता.२०-२-८२, पान ४५.

७) शानबाग,आर.डी.,उपरोक्त, पान ६०.

८) किता: पान ६२-६७.

९) इंडियन सेन्सस हॅन्ड बुक, जिल्हा सेन्सस हॅन्ड बुक, कोल्हापूर, प्रकाशक, डायरेक्टर, गव्हर्नमेंट प्रिंटींग स्टेशनरी ॲन्ड पब्लिकेशन, महाराष्ट्र स्टेट, बॉम्बे, इंग्रजी, १९८१, पान ६८.

१०) शानबाग,आर.डी. उपरोक्त, पान ६०.

११) किता:
साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.२८-१-१९४१, पान २.

१२) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.४-६-१९४०, पान ३.
शानबाग,आर.डी., उपरोक्त, पान ९१.


••

१३) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.५-२-४६, पान १.

१४) अर्ध साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.२१-७-५३,पान २.

१५) किता: ता.३-७-५३, पान २.

१६) शानबाग,आर०डी., उपरोक्त, पान ७२.

१७) किता:

१८) किता:

१९) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.१३-६-३३, पान ३.

२०) किता: पान ७.

२१) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.१५-८-४७, पान ७.
देशपांडे,बेळगाव जिल्ह्यातील स्वातंत्र्य संग्राम, जेकॉप प्रिंटर्स,
बेळगाव, मराठी, १९७८, पान ७९-८०.

२२) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.१९-५-३३, पान ३,
ता.९-६-३३, पान ३.

२३) किता: ता.९-६-३३, पान ३.
मासिक, तरुण भारत, बेळगाव, फेब्रुवारी-मार्च,१९२२, पान ३३.

२४) देशपांडे,बा.य., उपरोक्त, पान ७९-८०.

२५) सौ.प्रभु,प्रिया, उपरोक्त, पान ६ व १३.
मासिक, तरुण भारत, बेळगाव, जानेवारी-फेब्रुवारी,१९२३,पान ४१.

२६) सौ.प्रभु,प्रिया, उपरोक्त, पान १७.

२७) डॉ.खैरे ग.श्री.स्वभाव घडविणारी संस्था, उपरोक्त, पान ३१.

२८) सौ.प्रभु,प्रिया, उपरोक्त, पान ३७.

२९) किता: पान ३८,
साप्ताहिक, बेळगाव समाचार, ता.२०-३-४८, पान ३.

३०) किता: ता.२०-३-४८, पान ३.

-000-